**कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना.**

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बदली १०२०/प्र.क्र.६२/२०२०/आ(संनि),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० जुलै २०२०.

वाचा :- (१) जलसंपदा विभाग, शासन अधिसूचना क्रमांक : बदली १०१४/प्र.क्र.८१/२०१४/आ(संनि), दिनांक २५.४.२०१६

(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०२०/प्र.क्र.३०/कार्या १२, दिनांक ०७.०७.२०२०

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा दिनांक १.७.२००६ पासून अंमलात आला आहे. त्यानुसार राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रत्येक वर्षी एप्रिल व मे महिन्यात सर्वसाधारण बदल्या करण्यात येतात. कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात करावयाच्या बदल्यांसंदर्भातच्या सूचना वाचा येथील अनुक्रमांक २ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०७.०७.२०२० च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात जलसंपदा विभागांतर्गत करावयाच्या बदल्यांसंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**परिपत्रक :-**

जलसंपदा विभागांतर्गत संदर्भाधिन शासन अधिसूचना/परिपत्रक अन्वये बदल्या करताना खालील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(१) कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे बदलीचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार चालू वित्तीय वर्षात करावयाच्या सर्वसाधारण बदल्या दिनांक ३१.७.२०२० पर्यंत त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदांच्या १५ टक्के एवढ्या मर्यादेत

करण्यात याव्यात.

(२) सर्वसाधारण बदल्यांव्यतिरिक्त काही अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणांमुळे करावयाच्या बदल्यादेखील दिनांक ३१.७.२०२० पर्यंत बदली अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन करण्यात याव्यात.

(३) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे बदलीचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ३ मधील तरतूदीनुसार कोणत्याही अभियंत्याची नेमणूकीचा विहित पदावधी (३ वर्षे) पूर्ण केला असल्याखेरीज बदली करण्यात येवू नये.

(४) जलसंपदा विभाग, क्रमांक : बदली १०१४/प्र.क्र.८१/२०१४/आ(संनि), दिनांक २५.४.२०१६ च्या अधिसूचने अन्वये संबंधित मुख्य अभियंता यांना सार्वत्रिक बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे बदली अधिनियमातील कलम ३ मधील तरतूदीनुसार एकदा बदली आदेश निर्गमित केल्यानंतर त्या बदली आदेशात बदल/अंशत: बदल किंवा इतर अनुषंगिक बदल शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय करण्यात येवू नयेत. तथापि, अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदली आदेशात बदल करावयाचा झाल्यास संयुक्तिक कारणांसह प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

(५) सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही करताना प्रकल्पावरील कामाची निकड, अन्वेषण, सर्वेक्षण, गुणनियंत्रण कार्यप्रकारात अभियंत्यांची उपयुक्तता, सिंचन व्यवस्थापनातील रिक्त पदे प्राथम्याने भरण्याची दक्षता घेण्यात यावी.

(६) सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही करताना आदिवासी, नक्षलग्रस्त (गडचिरोली, चंद्रपुर व गोंदिया) तसेच आकांक्षित जिल्ह्यातील (गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद व वाशिम) व कोयना नगर येथील रिक्त पदे, तसेच मा.राज्यपाल महोदयांनी दिलेले अनुदेश आदिवासी/नक्षलग्रस्त/दुष्काळग्रस्त प्रदेशातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार पदे प्राथम्याने भरण्याची दक्षता घ्यावी.

(७) बदली करताना दिनांक ३१.७.२०२० रोजी रिक्त असलेल्या पदावर बदली करण्यात यावी. **भविष्यात सेवानिवृत्तिमुळे अथवा संभाव्य पदोन्नतीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर बदली करण्यात येवू नये.**

सदर शासन परिपत्रक जलसंपदा विभागाच्या wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(उध्दव र. दहिफळे)
शासनाचे उपसचिव

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) सर्व महासंचालक/कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
३) अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.
४) उप सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५) उप सचिव (सेवा)/(प्रशा)/(आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६) अवर सचिव (सेवा/संनि/राकसे/आस्था/गृ.व्य.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
८) अ.मु.स (जलसंपदा)/सचिव (लाक्षेवि)/सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक
९) जलसंपदा विभागातील सर्व आस्थापना कार्यासने.
१०) संग्रहार्थ/कार्यासन आ(संनि)